# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

------------------------------------------------------------------------------

## प्रेसनोट

# पीएमपीएमएल कडून सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवासाठी विशेष बससेवा

पुणे शहराच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये अग्रमानांकित असणारा ६९ वा सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव २०२३ महाराष्ट्रीय मंडळ क्रिडा संकुल, मुकुंदनगर, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर महोत्सवाकरीता परिवहन महामंडळाकडून दरवर्षी प्रमाणे विशेष बससेवा पुरविण्यात येत आहे. सदरच्या कार्यक्रमास पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांच्या विविध भागांतून असंख्य रसिक श्रोतावर्ग उपस्थिती दर्शवत आहे.

सवाई गंधर्व संगीत महोत्सवाच्या रसिक श्रोत्यांसाठी कार्यक्रम संपल्यानंतर परतीच्या सोयीसाठी परिवहन महामंडळाकडून २५ टक्के जादा दराने बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत.

### सवाई गंधर्व महोत्सवासाठी पीएमपीएमएल कडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या बसेसचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | मार्गाचे नाव | मार्गे | मुकुंदनगर येथून दि. १३ ते १५ व दि. १७/१२/२०२३ रोजी बस सुटण्याची वेळ | मुकुंदनगर येथून दि.१६/१२/२०२३ रोजी बस सुटण्याची वेळ | २५ टक्के जादा दराने तिकीट दर रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुकुंदनगर ते निगडी भक्ती शक्ती (मार्ग क्र. ४२ ने) | दांडेकर पूल, डेक्कन, वाकडेवाडी, कासारवाडी, पिंपरी, चिंचवड स्टेशन | रात्रौ १०.३० वा. | - | ४०/- |
| २ | मुकुंदनगर ते धायरी मारूती मंदिर (मार्ग क्र. ११७ ने) | दांडेकर पूल, विठ्ठलवाडी, आनंदनगर, वडगांव फाटा, धायरी गांव | रात्रौ १०.३० वा. | रात्रौ १२.३० | २५/- |
| ३ | मुकुंदनगर ते कोथरूड डेपो (मार्ग क्र. १०३ ने) | टिळक रोड, डेक्कन कॉर्नर, पौड फाटा, जयभवानीनगर, वनाज कंपनी | रात्रौ १०.३० वा. | रात्रौ १२.३० | २०/- |
| ४ | मुकुंदनगर ते वारजे माळवाडी (मार्ग क्र. ७२ ने) | डेक्कन कॉर्नर, पौड फाटा, कोथरूड स्टॅण्ड, गांधी भवन, कर्वेनगर | रात्रौ १०.३० वा. | रात्रौ १२.३० | २५/- |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेली बससेवा ही दि. १३/१२/२०२३ ते दि. १७/१२/२०२३ पर्यंत उपलब्ध आहे. तरी सवाई गंधर्व संगीत महोत्सवाच्या रसिक श्रोत्यांनी पीएमपीएमएलच्या बससेवेचा लाभ जास्तीत जास्त प्रमाणात घ्यावा, असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

sd/-

चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

दि. १२/१२/२०२३

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-

कामगार व जनता संपर्क अधिकारी

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.